दि.१२/०४/२०१६

प्रेस नोट

पोलीस भरती बाबत.

दिनांक २९/०३/२०१६ पासुन धुळे पोलीस कवायत मैदानावर मा. पोलीस अधिक्षक श्री साहेबराव पाटील यांचे नेतृत्वात पोलीस भरती प्रक्रीया सुरु आहे.

हजेरी पटाप्रमाणे एकुण ६०० उमेदवारांपैकी फक्त ३२८ उमेदवार भरती प्रक्रीयेसाठी हजर झाले व २७२ उमेदवार गैरहजर राहीले आहेत. हजर झालेल्या उमेदवारांपैकी उंची-३३, छाती-१४, कागदपत्र तपासणी-०३ असे एकुण ५० उमेदवार अपात्र झालेले असुन एकुण २७३ उमेदवार पात्र झाल्याने त्यांना चेस्ट नंबर देण्यांत आलेले आहेत. आपपावेतो एकुण ३९६८ चेस्ट नंबर देण्यात आलेले आहेत.

संपुर्ण पोलीस भरती प्रक्रिया दरम्यान पोलीस अधीक्षक श्री साहेबराव पाटील साहेब हे स्वतः जातीने लक्ष ठेवून आहेत स्वतः प्रत्येक इव्हेन्टवर जावुन उमेदवारांना भेटुन त्यांना काही अडीअडचण अगर शंका आहे काय? बाबत विचारपुस करीत असतात उमेदवारांना त्यांना मिळालेले चाचणीचे गुण त्याच ठिकाणी दाखविण्यात येतात व त्या बाबत व्हिडीओ रेकॉर्डींग देखील करण्यात येत असते. सदर ठिकाणी सि.सि.टि.व्ही. कॅमेरे कार्यरत करण्यात आलेले आहे. काही उमेदवारांना शंका वाटल्यास सिसिटीव्ही फुटेज व व्हीडीओ कॅमेरा रेकॉर्डीग दांखविण्यात येवून त्यांच्या शंकेचे निरसन व समाधान करण्यांत येते. शिवाय उमेदवारांचे व्यतिरिक्त कोणासही प्रवेश दिला जात नाही. संपुर्ण बंदोबस्तास असणारे अधिाकरी व कर्मचारी यांना प्रवेश पास देण्यात आलेले आहेत. चाचणी परीक्षेस नेमण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस भरती ही पारदर्शकपणे व निपक्षपातीपणे होणेबाबत मा.पोलीस अधिक्षक श्री.साहेबराव पाटील हे वारंवार सुचना देत असतात. विशेष करुन ग्रामिण भागातील उमेदवारांनी सतर्क राहणे आवश्यक असून कोणी एजंट व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी उमेदवारांना आम्ही तुम्हाला भरती करुन देतो आमची ओळख आहे वाटल्यास तुमचे काम झाल्यानंतर आम्हांस पैसे द्या, असे आमीष व प्रलोभन दाखविण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा इसमांची नांवे व माहिती मा.पोलीस अधिक्षक सो.,अपर पोलीस अधिक्षक सो व पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यांना तात्काळ कळविण्यांत यावे अशा इसमा विरुध्द गुन्हे दाखल करण्यांत येतील याबाबत मा.श्री साहेबराव पाटील,पोलीस अधिक्षक,धुळे यांनी सर्व उमेदवारांना आवाहन केलेले आहे.

सदर भरती प्रक्रियेत निवड मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. त्याच प्रमाणे अपर पोलीस अधीक्षक श्री.चंद्रकांत गवळी, प्र.पोलीस उप अधिक्षक (मु) धुळे श्री.डि.एस.गवळी, उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.हिंमत जाधव, श्री.योगीराज शेवगण, श्री.निलेश सोनवणे तसेच पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, सपोनि, पो.उप.नि., असे बंदोबस्ताकामी हजर होते.

सदर भरतीकामी पोलीस कवायत मैदानावर येणारे उमेदवारांसाठी आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्याच प्रमाणे वैद्यकीय पथक देखील हजर ठेवण्यात आले आहे.व ॲम्बुलन्सची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.

दिनांक २१/०४/२०१६ ते २३/०४/२०१६ पावेतो महिला उमेदवारांना पोलीस भरतीकामी बोलविण्यांत आलेले आहे.

तसेच ज्या उमेदवारांची शारीरीक चाचणी झालेली आहे त्यांचा अंतीम निकाल दिनांक २५/४/२०१६ रोजी पोलीस मुख्यालय धुळे येथील कवायत मैदानाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येणार आहे याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी बाबत कळविण्यात आले आहे.

सदरची भरती ही निःपक्षपाती व पारदर्शक पणे सुरु आहे.

( डि.एस.गवळी )
प्र.पोलीस उप अधीक्षक (मु)
पोलीस अधीक्षक धुळे करिता